



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : ११, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२५ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# नागपूर विमानतळाचा जागतिक दर्जाच्या प्रवेशद्वारात कायापालट होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, नागपूर :** विमानतळ परिसरातील या जमिनीच्या मूल्यवर्धनामुळे नागपूरच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते. विमानतळाभोवती व्यावसायिक, औद्योगिक आणि निवासी प्रकल्प उभे राहिल्यास शहरातील आर्थिक हालचाली वाढतील. सेवा क्षेत्र, वाहतूक, लॉजिस्टिक, हॉटेल, कार्यालयीन जागा आणि पूरक उद्योगांना चालना मिळण्याची शक्यता आहे. नियोजनबद्ध विकास झाल्यास विमानतळ परिसर शहराच्या नव्या वाढीच्या केंद्रात रूपांतरित होऊ शकतो.




**विमानतळालगतच्या २७१ हेक्टर जमिनीच्या आर्थिक मूल्यवर्धनाची प्रक्रिया सुरू**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणाला गती मिळाली असतानाच आता विमानतळालगतच्या २७१ हेक्टर जमिनीच्या आर्थिक मूल्यवर्धनाची (मॉनिटायझेशन) प्रक्रिया सुरू झाली आहे. मिहान इंडिया लिमिटेडने या जमिनीचा नियोजनबद्ध वापर करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार संस्थांकडून निविदा मागवल्या आहेत. या निर्णयामुळे विमानतळ परिसरातील व्यावसायिक, औद्योगिक, निवासी आणि विमान वाहतुकीशी संबंधित विकासाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

**नागपूर विमानतळाचा जागतिक दर्जाच्या दृष्टीकोनातून कायापालट**

नागपूर विमानतळाचा जागतिक दर्जाच्या प्रवेशद्वारात कायापालट करण्याच्या दृष्टीने आधुनिकीकरणाचे काम सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर विमानतळ परिसरातील उपलब्ध जमिनीचा अधिक परिणामकारक वापर करून उत्पन्ननिर्मिती करण्याचा विचार पुढे आला आहे. यामुळे विमानतळाभोवतीच्या भागात भविष्यात नवे व्यावसायिक केंद्र, लॉजिस्टिक सुविधा, सेवा उद्योग, निवासी प्रकल्प आणि विमान वाहतुकीशी संबंधित पूरक सुविधा विकसित होऊ शकतात.

**विकासाचे नियोजनही स्पष्ट होणार**

मिहान इंडिया लिमिटेडतर्फे नियुक्त होणारी सल्लागार संस्था बाजारातील मागणी, वाहतुकीची सुविधा, उपलब्ध पायाभूत व्यवस्था आणि जमिनीच्या वापराचे धोरण यांचा सखोल अभ्यास करणार आहे. या अभ्यासाच्या आधारे व्यावसायिक, औद्योगिक, निवासी तसेच विमान वाहतुकीशी संबंधित विकासाचा सर्वसमावेशक आराखडा तयार केला जाणार आहे. त्यामुळे विमानतळाच्या आधुनिकीकरणासोबतच परिसराच्या दीर्घकालीन विकासाचे नियोजनही स्पष्ट होणार आहे.

**जमिनीच्या विकासाचा आराखडा तयार केला जाणार**

मूल्यवर्धनासाठी निश्चित करण्यात आलेल्या २७१ हेक्टर जमिनीपैकी १२२ हेक्टर जमीन भारतीय विमानतळ प्राधिकरणाची आहे, तर १४९ हेक्टर जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेडची आहे. ही जमीन विमानतळाच्या मूळ कामकाजासाठी असलेल्या ९०० हेक्टर आणि जीएमआरला व्यावसायिक विकासासाठी देण्यात आलेल्या १०० हेक्टर जमिनीव्यतिरिक्त आहे. त्यामुळे विमानतळाच्या नियमित कामकाजावर परिणाम न होता स्वतंत्रपणे या जमिनीच्या विकासाचा आराखडा तयार केला जाणार आहे.

**जागतिक दर्जाचे प्रवेशद्वार बनवण्याच्या दृष्टीने काम...**

केंद्रीय मंत्रिमंडळाने मे महिन्यात भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीचा मिहान इंडिया लिमिटेडला दिलेला भाडेपट्टा कालावधी वाढवण्यास मान्यता दिली होती. हा कालावधी आता जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडला दिलेल्या ३० वर्षांच्या कराराशी जोडण्यात आला आहे. जीएमआर कंपनी व्यावसायिक कामकाज सुरू झाल्यानंतर नागपूर विमानतळाचा कायापालट करून त्याला जागतिक दर्जाचे प्रवेशद्वारबनवण्याच्या दृष्टीने काम करीत आहे.

**विमानतळ प्रवासी हाताळणी क्षमता तीन कोटींपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट**

आधुनिकीकरणातून नागपूर विमानतळाची वार्षिक प्रवासी हाताळणी क्षमता तीन कोटींपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रवासी क्षमता वाढली, तर विमानतळ परिसरात पूरक सेवा, हॉटेल, कार्यालयीन जागा, वाहतूक, लॉजिस्टिक आणि इतर व्यावसायिक गरजा वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे या २७१ हेक्टर जमिनीच्या मूल्यवर्धनाला नागपूरच्या भविष्यातील शहरी आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे.

# खापरखेड्यात कायदा सुव्यवस्था ढासळली ! दगडी चाळ गँगवार प्रकरणानंतर लुटमारीची घटना

## चाकूचा धाक दाखवून लुटमार; बिनासंगम शिवारात घडली घटना

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** दिवसेंदिवस खापरखेडा परिसरात कायदा सुव्यवस्था ढासळत चालली असून दगडी चाळ गँगवार प्रकरणानंतर लुटमारीची घटना बिना(संगम) शिवारात २३ ऑगस्ट रविवारला रात्रीच्या सुमारास घडली असून तीन तासात आरोपींचा शोध घेऊन खापरखेडा पोलिसानी चार सराईत गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या आहेत. सदर प्रकरणात ४९ हजार ८०० रुपये नगदी, सोन्याची चैन, मोबाईल असा एकूण २ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल खापरखेडा पोलिसांनी जप्त केला असून पोलीस तपासात मित्रानेच टीप दिल्याचे उघडकीस आले आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

लखन उर्फ गोलू बादल सेठ(२४) पिवळी नदी नागपूर, सक्षम सुशांत डोंगरे (२०) पिवळी नदी नागपूर, आसिफ मेहम्मद मुस्तकीम अली (१८) भिलगाव कामठी, भूषण सुनील कांबळे (२४) बालाजी नगर भिलगाव कामठी असे अटकेतील आरोपीची नावे आहेत.

फिर्यादी अमन त्रिलोकचनदास दुबे(३२) महाबळेश्वर नगर पिवळी नदी नागपूर हे २३ ऑगस्ट रविवारला आरोपी लखन उर्फ गोलू बादल सेठ या मित्रांसोबत बिना(संगम) येथे पार्टी करण्यासाठी आले होते. घटनेतील आरोपी लखनने सक्षम डोंगरे याला टीप दिली शिवाय घटनास्थळ लोकेशन व फोटो पाठवले.

पार्टी आटोपून सायंकाळच्या सुमारास अमन व लखन घरी जात असताना ठरल्याप्रमाणे आरोपी सक्षम डोंगरे, आसिफ मोहम्मद, भूषण कांबळे दुचाकीने गाठले. यावेळी अमनच्या गळ्याला चाकू लावून जीवे मारण्याची धमकी दिली, शिवाय अश्लील शिवीगाळ करून अमनच्या खिशातील ४९ हजार ८०० रुपये नगदी २ लाख ४० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन व मोबाईल असा एकूण २ लाख ९६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हिसकावून पळून गेले.

यावेळी फिर्यादी अमन दुबे व आरोपी लखन उर्फ गोलू बादल सेठ यांनी खापरखेडा पोलीस ठाणे गाठले. घटनेचे गंभीर्य ओळखून पोलीस शिपाई शेखर वानखेडे, आशिष कापसे यांनी आरोपी लखन याला घटनास्थळावर आणले. पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत असल्यामूळे पोलिसांचा संशय बळावला. यावेळी आरोपी लखनचा मोबाईल तपासला असता घटनेतील आरोपीना टीप दिल्याचे उघडकीस आले.

पोलीस खाक्या दाखवताच आरोपी लखनने घटनाक्रम सांगितलं, तीन तासात घटनेतील आरोपीच्या मुसक्या आवळल्या. याप्रकरणी खापरखेडा पोलिसानी बीएनएस २०२३ चे कलम ३०९(४), २९६, ३५१(२), ३५२, १२६(२), ३(५) सह महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३५ अन्वये गुन्ह्याची नोंद केली आहे. सोमवारला आरोपी लखन, सक्षम, आसिफ मोहम्मद, भूषण याना न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन यादव, पोउपनि अनोल पाटील, एएसआय मनोहर राऊत, मुकेश महालगावे, संदीप सगणे, अमित खोब्रागडे, आशिष मेश्राम, बादल गिरी, आशिष कापसे, शेखर वानखेडे, सचिन दखने, निल गव्हाणे, विशाल नाखले यांनी कार्यवाहीत भाग घेतला.

# बोरी येथील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ५१३ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर...

**अक्षराज : जफर शेख**

**दि.२४, बोरी (परभणी) :** बोरी (ता.जिंतूर)येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तब्बल ५१३ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले असून, या लाभार्थ्यांची यादी श्रीराम मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात जाहीर करण्यात आली. घरकुल मंजूर झाल्याने लाभार्थी कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




जिल्हा परिषद सदस्या दीपालीताई चौधरी तसेच माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अजय अशोकराव चौधरी यांच्या नेतृत्वाखाली या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोरी परिसरातील ग्रामस्थ तसेच घरकुल योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून गरजू व पात्र कुटुंबांना हक्काचे पक्के घर मिळावे, यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. बोरी येथे ५१३ लाभार्थ्यांची यादी जाहीर झाल्याने अनेक गरजू कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी अजय चौधरी व सौ. दीपाली चौधरी यांनी पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य केले जाईल. तसेच घरकुल योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास सरपंच निर्मलाताई चौधरी, पंचायत समिती सदस्या लक्ष्मीबाई कनकुटे, रफिकभाई, उपसरपंच शाईनबी, शशिकांत चौधरी, गुलाबराव चौधरी, बाबर खान, शेख वजीर, शेख खुद्दूस, मोहम्मद पठाण, करुण नागरे, राहुल कनकुटे, अनंतराव चौधरी, संजू चौधरी, खारी इकबाल शेख,बालू चांदीवाले, शेख युनूस, सुभाषदादा घोलप यांच्यासह बोरी येथील हजारो चा संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.

जनता दरबाराच्या आयोजनासाठी ग्रामपंचायत कर्मचारी शरदभाऊ शेळके, सलीम पठाण, डाके तसेच इतर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

५१३ कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळणार असल्याने बोरी परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, घरकुलाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना हक्काच्या निवाऱ्याचे स्वप्न साकार होणार आहे.

# देशात पहिल्यांदाच स्वयंचलित 'ई-ऑर्डर मॉड्यूल'; महाराष्ट्राचा नवा विक्रम

अक्षराज : जे. के. पोळ

मुंबई, दि. २४ : राज्यातील मनुष्यबळ व्यवस्थापनामध्ये अनेक सुधारणांसह आमूलाग्र बदल घडवून महाराष्ट्र देशात अव्वल ठरला आहे. 'महा ई-एचआरएमएस' ही प्रणाली गतिमान प्रशासनाचा चेहरा ठरेल आणि महाराष्ट्राने डिजिटल सामर्थ्याची आणखी एक यशोगाथा देशासमोर ठेवली आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या 'महा ई-एचआरएमएस', 'महा-आयएएस' आणि 'मेंटॉर मेंटी पोर्टल' या डिजिटल मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालींचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे शुभारंभ करण्यात आला. यावेळी 'जिज्ञासा' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्मार्ट सहाय्यकासह देशातील पहिले स्वयंचलित 'ई-ऑर्डर मॉड्यूल'ही कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, नाविन्यता आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा तसेच भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासकीय प्रक्रिया पुनर्रचना अर्थात जीपीआर अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या व्यापक प्रशासकीय सुधारणांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. शतकाहून अधिक काळ प्रचलित असलेल्या कागदाधारित कार्यपद्धती व सेवापुस्तकांचे आधुनिकीकरण करून प्रशासन अधिक सुलभ, गतिमान आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यात येत आहे. या प्रणालीमुळे नियुक्ती आदेशापासून ते सेवानिवृत्तीपर्यंतची संपूर्ण सेवा व्यवस्था डिजिटल स्वरूपात येणार असून, पदोन्नतीची प्रक्रियाही गतिमान होणार आहे.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, 'महा ई-एचआरएमएस' लागू करणे हे राज्याच्या शासन पद्धतीतील क्रांतिकारी पाऊल आहे. सहा डिजिटल साधनांचे एकत्रीकरण करून विकसित केलेल्या या प्रणालीमुळे सेवाविषयक बाबींमध्ये गतिमानता येईल आणि डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात राज्याने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात राज्यातील आयएएस संवर्गाचा समावेश करण्यात आला असून, पुढील टप्प्यात राज्य शासनातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. शासनाच्या ४२ विभागांमधील १२३ आस्थापनांमध्ये प्रचलित विविध नियम व कार्यपद्धतींचे या प्रणालीत एकत्रीकरण करण्यात आले आहे. यावेळी मुंबईच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ काटीयार, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव सुभाष उमराणीकर, उपसचिव अनुष्का दळवी, कक्ष अधिकारी प्रियांका तावडे, श्वेता सुर्यवंशी, विशाल ढोले, लेखा व कोषागारे संचालनालयाच्या संचालक दिपा देशपांडे तसेच एनआयसीच्या सपना कपूर यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव लीना संखे यांनी केले, तर आभार सहसचिव प्रशांत बडगेरी यांनी मानले.

'महा ई-एचआरएमएस'मुळे १९३५ पासून प्रचलित असलेल्या भौतिक सेवापुस्तकाऐवजी संरचित डिजिटल 'ई-सेवापुस्तक' उपलब्ध होणार आहे. 'ई-ऑर्डर मॉड्यूल'मधून निर्गमित प्रत्येक आदेशानुसार सेवाविषयक नोंदी स्वयंचलितपणे अद्ययावत होतील आणि संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना एसएमएस अथवा ई-मेलद्वारे सूचना मिळतील.

'जिज्ञासा' हा आयएएस व एआयएस सेवांशी संबंधित नियमांवर आधारित कृत्रिम बुद्धिमत्ता सहाय्यक असून, 'मेंटॉर मेंटी' पोर्टलद्वारे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अनुभव व प्रशासकीय ज्ञान कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविले जाणार आहे. ईएचआरएमएस मोबाईल ॲपद्वारे वेतन पावती, उपस्थिती आणि रजेच्या अर्जासह विविध सेवा उपलब्ध होतील. राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्राच्या महाराष्ट्र राज्य घटकाने विकसित केलेल्या या सुरक्षित, ओपन सोर्सवर आधारित डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये ई-ऑफिस, आयगॉट कर्मयोगी, महापार, सेवार्थ, एनपीएस, डिजिलॉकर, भाषिणी, ई-कॅबिनेटसह विविध प्लॅटफॉर्मची जोडणी करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानाचाही त्यात समावेश करण्यात आला आहे.

# रानडुकरांच्या उच्छादामुळे शेतकरी त्रस्त, बंदोबस्त करण्याची वनविभागाकडे मागणी

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२४, सोयगाव :** सोयगाव शेतीशिवारात रानडुकरांनी उच्छाद माजवला आहे. कपाशी, मक्का, भुईमूग, उडीद, मुंग चवळी पिकांचे अतोनात नुकसान रानडुकरांनी केले आहे. आतापर्यंत डोंगर क्षेत्राला लागून असलेल्या शिवारात असणारे रानडुकरांनी गावालगतच्या शेतात आपला मोर्चा वळवीला असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांनी वनविभागाकडे केली आहे.



सोयगाव तालुक्यात असलेल्या डोंगर रांगेत अनेक जंगली प्राण्यांचे वास्तव्य आहे. त्यामुळे डोंगर क्षेत्राला लागून असलेल्या शेतशिवारात रानडुकर, रोही, हरीण आदी प्राण्यांकडून नुकसान होते. परंतु आता हे प्राणी आता गावा लगत असलेल्या शेत शिवारात दिसून येत आहे. कळापा कळपा ने शेतात घुसून नुकसान करणाऱ्या उपद्रवी प्राण्यांच्या उच्छादामुळे शेतकरी त्रस्त झाले आहे. मक्का, कपाशी, भुईमूग, उडीद, मुंग चवळी आदी पिकांवर ताव मारण्यासाठी हे पिकं उपटून फेकत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. अशा उपद्रवी प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा व झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देण्याच्या मागणीचे निवेदन नगरसेवक संतोष बोडखे, राजू दुतोंडे, संदीप चौधरी, पूनम परदेशीं, भारत तायडे, अरुण वाघ आदीनी वनपरीक्षेत्र कार्यालयात दिले आहे.




## मोफत नव्हे; चांगली सेवा हवी

राजधानीत महिलांसाठीच्या मोफत बस प्रवासाच्या योजनेला डिजिटल वळण देण्याचा व सध्याच्या कागदी पासऐवजी 'सहेली पिंक स्मार्ट कार्ड' सक्तीचे करण्याचा निर्णय दिल्लीच्या सरकारनं यंदा जूनमध्ये घेतला. नंतर तो स्वातंत्र्यदिनापर्यंत आणि आता या महिनाअखेर म्हणजे ३१ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलला. दिल्ली सरकारनं आधी दिमाखात याबाबतची घोषणा केली आणि अनेक महिलांनी विरोध करत करतच कार्ड मिळवण्यासाठी घाईने रांगा लावल्या. दिल्ली परिवहन महामंडळाच्या (डीटीसी) बसल्या जागेवरून न उठणाऱ्या बस वाहकांनाही, कार्ड नसेल तर महिलांना मोफत प्रवास करू द्यायचा नाही, असा कडक संदेश देण्यात आला. पण काही दिवसांतच अनेक महिलांचा विरोध, कार्ड वितरण अपुरे, केंद्रांवर प्रचंड गर्दी, इलेक्ट्रॉनिक तिकीट यंत्रांतील तांत्रिक अडचणी, इंटरनेटचा खेळखोळंबा, पडताळणीची संथ प्रक्रिया अशी सरकारछाप वस्तुस्थिती समोर आली. या गोंधळामुळे अंमलबजावणी ३१ ऑगस्टपर्यंत पुढे गेली. अर्थात ही सध्याची तारीख आहे. त्याची अवस्था 'तारीख पे तारीख' होणार नाहीच, असं ठामपणे सांगता येत नाही! या सगळ्यात सर्वाधिक धावपळ झाली ती रोज बसनं प्रवास करणाऱ्या महिलांची. कार्यालयात, महाविद्यालयात जाणाऱ्यांपासून, घरकाम करणाऱ्या, परिचारिका, कर्मचारी अशा लाखो महिलांच्या रांगा केंद्रांवर लागल्या. त्यांना कागदपत्रांबाबत वेगवेगळ्या सूचना मिळाल्या. काही ठिकाणी सर्व्हर बंद, काही ठिकाणी मशीन बंद, तर काही ठिकाणी 'उद्या या' अशी पाटी. बहादूरशहा जफर रस्त्यावरच्या टपाल कार्यालयातल्या केंद्रांवर तर संतप्त महिलांचा रुद्रावतार रोजचाच झाला त्या काळात. दिल्लीकरांना गेली १५ वर्षं 'मोफत-मोफत'ची सवय लागली असताना सध्याच्या सरकारचं याबाबतीतलं म्हणणं योग्य आहे. महिला बसप्रवासासाठीच्या या स्मार्ट कार्डमुळं पारदर्शकता येईल, मोफत आहे म्हणून दिल्लीभर वाटेल तिथं फिरा, या धर्तीचा गैरवापर कमी होईल आणि अनुदानाचा हिशेब अचूक होईल. पण प्रत्येक चांगल्या कल्पनेचं यश अंमलबजावणीवर अवलंबून असतं. मुळात रेखा गुप्ता सरकारनं १ ऑगस्टची तारीख का जाहीर केली? डिजिटल प्रणाली लागू करण्यापूर्वी सर्व कार्डं वितरित करण्याची तयारीच नव्हती का? हजारो डीटीसी बसेसच्या वाहकांकडची तिकीट प्रणालीची यंत्रं व्यवस्थित चालत होती याची चाचणी घेतली होती का? या प्रश्नांची उत्तरं वेळीच शोधली असती तर मुदतवाढीची गरजच पडली नसती. पुढे व्यवस्था सुरळीत चालली, सर्व महिलांना कार्ड सहज वापरता आलं, यंत्रं नीट चालली, तर ते कौतुकास्पदच ठरेल. पण जर पुन्हा तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊन, पडताळणीचा गोंधळ किंवा नागरिकांची धावपळ सुरू झाली तर? डिजिटल भारताचं स्वप्न नक्कीच स्वागतार्ह व गुलाबी आहे. मात्र डिजिटल व्यवस्थेची पहिली अट भक्कम पूर्वतयारी, दुसरी विश्वासार्हता आणि तिसरी नागरिकांचा विश्वास. यात आपण कुठे आहोत? स्मार्ट कार्डला विरोध होण्याचे आणखी एक कारण म्हणजे ही पिंक कार्ड 'आधार'शी जोडलेली आहेत. म्हणजे ज्यांचं आधार कार्ड दिल्ली आणि एनसीआरचं असेल त्यांनाच ही कार्ड मिळतील. मात्र रोजीरोटीसाठी देशभरातून दिल्लीत आलेल्या महिलांची संख्या काही लाखांमध्ये आहे. बसप्रवास करणाऱ्यांमध्ये हा वर्ग मोठा आहे आणि तिथूनच आता या योजनेला विरोध होतो आहे. तो सरकारला दुर्लक्षित करणे परवडणार नाही. आधीच जेन झीमध्ये नाराजीची लाट असताना नवरात्रीच्या तोंडावर ही 'मातृशक्ती' राजधानीत कोपली तर? दिल्लीतला गुलाबी गोंधळ पाहताना महाराष्ट्रातलं चित्रही समोर येणं स्वाभाविक. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणची शहर बससेवांची अवस्था वेगवेगळी असली, तरी प्रश्न तोच आहे. मुंबई-नाशिक- ठाणे- पुण्यात वगैरे बसगाड्या आहेत; पण त्या वेळेवर येतील याची खात्री ब्रह्मदेवाला तरी देता येईल का? खरं तर लोकांना मोफत सेवा हवी, की चांगली सेवा, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. बस वेळेवर येत असतील, त्या स्वच्छ, सुरक्षित आणि पुरेशा संख्येने असतील, तर प्रवाशांना तिकीट काढताना फारसा आक्षेप नसतो. पण सेवा अपुरी आणि त्यावर 'मोफत'चे रंगीत फलक लावले, तर त्याचे राजकारण होते; सार्वजनिक वाहतूक सुधारत नाही. दिल्लीत आज गुलाबी तिकीट चर्चेत आहे; उद्या कदाचित दुसरे कार्ड येईल. कार्डाचा रंग महत्त्वाचा नसतो; बस वेळेवर आली की नाही, हे महत्त्वाचे असते. दिल्लीत मेट्रो आहे, पण इतरत्र बससेवा ही त्या त्या शहराच्या अर्थव्यवस्थेची आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची रक्तवाहिनी असते. तीच सक्षम नसेल, तर कोणतंही स्मार्ट कार्ड नागरिकांचा प्रवास स्मार्ट करू शकत नाही. पिंक बसकार्डचा हा गोंधळ सुरू असताना राजधानीत इतरही घडामोडी सुरू होत्या. 'नीट' पेपरफुटीच्या विरोधात जंतर-मंतरवर विद्यार्थी आंदोलन झालं. उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी एका सकाळी उचललं आणि मग हजारो तरुणांनी हे आंदोलनही उचलून धरलं. संसद अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांवर लाठीमार झाला, नंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. संसद अधिवेशन गोंधळात वाहून गेलं आणि त्याच दरम्यान दिल्ली सरकारनं डीटीसीच्या पिंक कार्डच्या सक्तीची मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवली. आता त्यात आणखी वाढ झाली. हा घटनाक्रम निव्वळ योगायोग म्हणावा? ते आंदोलन झालं नसतं, तर कागदी बसपासची मुदत वाढवली गेली असती का? असे प्रश्न विचारले जाणं स्वाभाविक. दिल्लीचा हा धडा इतर राज्यांनीही घेतला तर भविष्यातले अनेक प्रश्न मार्गी लागतील.

**-- मंगेश वैशंपायन**

## 'हमको इंडियन बोलो!' : ईशान्य भारताला परके समजण्याची मानसिकता बदलली पाहिजे

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती, परंपरा, भौगोलिक परिस्थिती आणि चेहऱ्यापासून रंगरूपापर्यंत असंख्य विविधता भारताच्या ओळखीचा भाग आहे. मात्र, याच विविधतेकडे आपण एकात्मतेच्या नजरेने पाहण्याऐवजी कधी कधी पूर्वग्रहाच्या चष्म्यातून पाहतो, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ईशान्य भारतातील नागरिकांना त्यांच्या चेहऱ्याच्या ठेवणीवरून 'चिनी' किंवा 'परदेशी' संबोधण्याची प्रवृत्ती हा केवळ विनोदाचा विषय नसून भारतीयत्वाच्या व्यापक संकल्पनेलाच धक्का देणारा गंभीर सामाजिक प्रश्न आहे.

अलीकडे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका लहान मुलीच्या व्हिडिओने या प्रश्नाकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले. 'आम्हाला इंडियन बोला' अशी तिची भावनिक विनंती अनेकांच्या मनाला चटका लावून गेली. आम्ही भारतीय आहोत, आम्ही इटानगरमध्ये राहतो, तरी आमच्या दिसण्यावरून आम्हाला चिनी का म्हटले जाते, असा तिचा सवाल आहे. एखाद्या निरागस मुलीला आपल्या देशातीलच नागरिकांनी आपण भारतीय आहोत हे सांगण्याची वेळ यावी, हीच आपल्या सामाजिक मानसिकतेसाठी आत्मपरीक्षणाची बाब आहे.

ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्कीम या राज्यांचा भारताच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक रचनेत अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. या प्रदेशाने देशाच्या संरक्षणापासून क्रीडा, शिक्षण, कला, संगीत आणि प्रशासनापर्यंत अनेक क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले आहे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन अनेकदा कठीण परिस्थितीतून जात असते. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यात तेथील नागरिकांची भूमिका महत्त्वाची आहे. अशा नागरिकांना त्यांच्या रूपावरून परके ठरवणे म्हणजे त्यांच्या योगदानाचा आणि भारतीयत्वाचा अपमानच होय.




आपल्या देशातील एखाद्या व्यक्तीचे डोळे, चेहऱ्याची ठेवण किंवा त्वचेचा रंग आपल्या परिचयाच्या चौकटीपेक्षा वेगळा आहे म्हणून त्याला परदेशी समजणे ही अज्ञानातून निर्माण झालेली मानसिकता आहे. भारतीयत्वाला विशिष्ट चेहरा नाही. भारतीय असण्यासाठी एखाद्या ठरावीक पद्धतीचे दिसणे आवश्यक नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत प्रत्येक नागरिक भारताचा समान नागरिक आहे.

विशेषतः महानगरांमध्ये शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायासाठी ईशान्येकडील राज्यांमधून मोठ्या संख्येने तरुण-तरुणी येतात. त्यांना त्यांच्या नावावरून, भाषेवरून किंवा चेहऱ्याच्या ठेवणीवरून हिणवले जाणे, त्यांची खिल्ली उडवली जाणे किंवा 'चिनी' म्हणून संबोधले जाणे ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. एखाद्याला विनोद म्हणून केलेली टिप्पणी दुसऱ्याच्या मनावर किती खोल परिणाम करू शकते, याचा विचार आपण केला पाहिजे. सतत परकेपणाची जाणीव करून दिली गेल्यास त्या नागरिकांच्या मनात आपल्या देशाबद्दलच दुरावा निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच अशा घटना किरकोळ समजून दुर्लक्षित करता कामा नये.

ईशान्य भारत हा भारताचा केवळ सीमावर्ती प्रदेश नाही; तो भारताच्या आत्म्याचा अविभाज्य भाग आहे. या प्रदेशातील लोकांची संस्कृती, लोककला, संगीत, नृत्य, हस्तकला, खाद्यपरंपरा आणि जीवनशैली भारताच्या सांस्कृतिक वैविध्याला अधिक समृद्ध करतात. त्यांच्या वेगळेपणाचा आदर करणे म्हणजे त्यांना वेगळे मानणे नव्हे; उलट त्यांच्या वैशिष्ट्यांसह त्यांना भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहात समान स्थान देणे होय.

गेल्या काही वर्षांत ईशान्य भारताच्या विकासाकडे केंद्र आणि राज्य सरकारांकडून अधिक लक्ष दिले जात आहे. रस्ते, रेल्वे, विमानसेवा, शिक्षण, डिजिटल कनेक्टिव्हिटी, पर्यटन आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचे प्रयत्न होत आहेत. ईशान्येकडील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. क्रीडा क्षेत्रात या राज्यांतील तरुणांनी मिळवलेल्या यशामुळे संपूर्ण देशाला अभिमान वाटतो. कला, संगीत आणि सांस्कृतिक क्षेत्रातही ईशान्य भारताची स्वतंत्र ओळख आहे. ही ओळख भारताच्या व्यापक ओळखीला समृद्ध करणारी आहे. मात्र केवळ विकासकामे करून प्रश्न सुटणार नाही. मानसिकतेत बदल होणे तितकेच आवश्यक आहे. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता ती नागरिकांच्या वर्तनातून दिसली पाहिजे. शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये भारताच्या ईशान्येकडील राज्यांविषयी अधिक माहिती दिली पाहिजे. तेथील इतिहास, संस्कृती, समाजजीवन आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाहिजे. देशातील विविध प्रदेशांतील विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवली पाहिजे.

माध्यमे आणि सोशल मीडिया यांचीही या संदर्भात मोठी जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या दिसण्याची खिल्ली उडवणारे किंवा एखाद्या समाजसमूहाला परके ठरवणारे विनोद 'मनोरंजन' म्हणून प्रसारित होऊ नयेत. सोशल मीडियावर एखाद्या मुलीने आपल्या मनातील वेदना व्यक्त केल्यानंतर तिचे कौतुक करण्यापेक्षा त्या वेदनेमागचे कारण समाजाने समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रध्वजाला सलाम करणे किंवा राष्ट्रगीत म्हणणे नव्हे. देशभक्ती म्हणजे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचा सन्मान करणे. आपल्या शेजाऱ्याची भाषा वेगळी असली, त्याचा धर्म वेगळा असला, त्याची संस्कृती वेगळी असली किंवा त्याचा चेहरा आपल्या ओळखीपेक्षा वेगळा असला तरी तो आपलाच भारतीय नागरिक आहे, ही भावना मनात रुजवणे म्हणजे खरी देशभक्ती.

'हमको इंडियन बोलो' या एका लहान मुलीच्या शब्दांमध्ये त्यामुळे केवळ तिची व्यक्तिगत तक्रार नाही; तर संपूर्ण समाजाला विचार करायला लावणारा मोठा संदेश आहे. तिला किंवा ईशान्य भारतातील कोणत्याही नागरिकाला आपले भारतीयत्व सिद्ध करण्याची वेळ पुन्हा येऊ नये. त्यांच्या चेहऱ्यात आपल्याला परकेपणा नव्हे, तर भारताची विविधता दिसली पाहिजे.

भारताची खरी ताकद त्याच्या एकसारखेपणात नाही, तर विविधतेत एकता राखण्याच्या क्षमतेत आहे. त्यामुळे आता प्रश्न 'तू कुठला दिसतोस?' हा नसून 'तू भारतीय आहेस, एवढेच पुरेसे नाही का?' असा असायला हवा.

ईशान्य भारताला मुख्य प्रवाहात आणण्याची गरज नाही; कारण तो आधीपासूनच भारताच्या मुख्य प्रवाहाचा अविभाज्य भाग आहे. गरज आहे ती फक्त आपल्या मनसिकतेतील भिंती पाडण्याची. 'हमको इंडियन बोलो' ही एका मुलीची आर्त हाक भविष्यात कोणत्याही भारतीयाला द्यावी लागू नये, हीच खरी राष्ट्रीय एकात्मतेची कसोटी आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## विमुक्त जमातींचा १८७१ ते २०२६पर्यंतचा प्रवास : गुन्हेगार ठरवलेल्या जमातींपासून ते नागरिकत्वाच्या शोधापर्यंत

भारताच्या सामाजिक इतिहासातील सर्वांत मोठ्या अन्यायांपैकी एक अन्याय म्हणजे भटक्या, अर्धभटक्या आणि विमुक्त जमातींना ब्रिटिशांनी जन्मतः गुन्हेगार ठरवणे हा होय. १८७१ साली ब्रिटिश सरकारने क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट लागू केला आणि शेकडो जमातींना सामूहिक गुन्हेगार घोषित केले. या कायद्यामुळे लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये हा कायदा रद्द झाला, पण त्यांचा कलंक मात्र संपला नाही. आज २०२६ मध्येही अनेक विमुक्त जमातींना संशयित नागरिक म्हणून जगावे लागते, ही भारतीय लोकशाहीची वेदनादायी वस्तुस्थिती आहे.

**१८७१ : गुन्हेगारीचे कायदेशीर शिक्कामोर्तब**

ब्रिटिश राजवटीने स्थिर शेतीप्रधान समाजाला सभ्य मानले, तर भटक्या जीवनपद्धतीकडे संशयाने पाहिले. व्यापारी, पशुपालक, कलावंत, दगडकाम करणारे, वाहतूक करणारे आणि पारंपरिक कौशल्यांवर जगणाऱ्या अनेक जमातींना गुन्हेगार म्हणून नोंदवले गेले. जन्माला आलेले मूलही गुन्हेगार म्हणून सरकारी नोंदीत दाखल होत असे. गाव सोडण्यासाठी पोलिसांची परवानगी आवश्यक असे. ही शिक्षा व्यक्तीला नव्हे तर संपूर्ण समुदायाला होती.

या कायद्याचा उद्देश गुन्हेगारी रोखणे नसून भटक्या समाजावर नियंत्रण ठेवणे हा होता. ब्रिटिश प्रशासनाला कर वसुली, पोलिस नियंत्रण आणि श्रमशक्तीचे व्यवस्थापन सोपे व्हावे म्हणून या जमातींना वसाहतींमध्ये डांबण्यात आले. अनेक ठिकाणी सक्तीची मजुरी घेतली गेली. त्यामुळे हा कायदा केवळ फौजदारी कायदा नव्हता; तो सामाजिक गुलामीचे साधन होता.

**स्वातंत्र्य आणि अपूर्ण मुक्ती**

भारतीय राज्यघटनेने समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे अधिकार दिले. त्यामुळे क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत ठरत होता. अखेर १९५२ मध्ये हा कायदा रद्द करण्यात आला आणि या समुदायांना विमुक्त घोषित करण्यात आले. परंतु केवळ कायदा रद्द झाला; पुनर्वसन, जमीन, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक पुनर्स्थापना यासाठी सर्वंकष कार्यक्रम राबवला गेला नाही.

त्याहून गंभीर बाब म्हणजे अनेक राज्यांनी हॅबिच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट लागू केले. कायद्याची भाषा व्यक्तीपर्यंत मर्यादित असली तरी पोलिसांच्या नजरेत पूर्वीच्या गुन्हेगार जमाती संशयितच राहिल्या. आजही चोरी किंवा इतर गुन्ह्यांच्या तपासात प्रथम संशय या समुदायांवर जातो, असे अनुभव अनेक ठिकाणी ऐकायला मिळतात.

**शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका**

विमुक्त जातींमधील साक्षरता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. स्थलांतरित जीवनशैली, गरिबी, वस्ती नसणे, शाळांमधील भेदभाव आणि निवासव्यवस्थेचा अभाव यामुळे मुलांचे शिक्षण लवकर खंडित होते. आरोग्याच्या बाबतीत मातामृत्यू, बालकुपोषण, व्यसनाधीनता, असुरक्षित कामे आणि आरोग्यसेवांपर्यंत मर्यादित पोहोच या समस्या गंभीर आहेत.

पारंपरिक व्यवसायांवर आधुनिक बाजारपेठ, यांत्रिकीकरण आणि शहरीकरणाचा परिणाम झाला. दगडकाम, जनावरांचा व्यापार, लोककला, फिरती विक्री, टोपल्या बनवणे यांसारख्या व्यवसायांचे उत्पन्न घटले. परिणामी मोठा समुदाय असंघटित मजुरीकडे ढकलला गेला.

**आयोगांनी दाखवलेले वास्तव**

रेणके आयोग (२००८) आणि इदाते आयोग (२०१८) यांनी विमुक्त, भटक्या आणि अर्धभटक्या जमातींची दारिद्र्य, निरक्षरता, बेघरपण, जमिनविहीनता आणि सामाजिक बहिष्काराची स्थिती स्पष्ट केली. त्यांनी स्वतंत्र धोरण, अचूक जनगणना, शैक्षणिक सुविधा, निवास, आरोग्य आणि उपजीविका कार्यक्रमांची शिफारस केली. परंतु या शिफारशींची अंमलबजावणी मर्यादित राहिली.

**संविधानात स्थान कुठे?**

विमुक्त जमातींची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्यांचे स्वतंत्र संवैधानिक स्थान नाही. काही जमाती अनुसूचित जातींमध्ये, काही अनुसूचित जमातींमध्ये, काही इतर मागासवर्गात तर काही राज्यनिहाय स्वतंत्र वर्गात टाकल्या गेल्या. त्यामुळे एकसंध धोरण तयार झाले नाही. जनगणनेतही त्यांची स्वतंत्र नोंद नसल्याने त्यांच्या लोकसंख्येचा आणि वास्तविक स्थितीचा अचूक अंदाज उपलब्ध नाही. समकालीन सामाजिक चळवळींची दिशा

महाराष्ट्रासह देशभरातील विमुक्त संघटना आता गुन्हेगार जमाती ही ओळख नाकारून वासाहतिक अन्यायाचे बळी अशी नवी ओळख मांडत आहेत. आरक्षणातील स्वतंत्र हिस्सा, स्वतंत्र संवैधानिक अनुसूची, जमीन हक्क, शिक्षण आणि सन्मान्य नागरिकत्व या मागण्या अधिक तीव्र होत आहेत. या चळवळींनी विमुक्त प्रश्नाला सामाजिक न्यायाच्या राष्ट्रीय चर्चेत आणले आहे.

**समकालीन अनुत्तरीत प्रश्न...**

आज विमुक्त जमातीसमोर तीन मूलभूत प्रश्न उभे आहेत.

१. कलंकाचा प्रश्न: कायदा रद्द झाला तरी सामाजिक स्मृतीतील गुन्हेगारपण टिकून आहे.

२. अदृश्यतेचा प्रश्न: स्वतंत्र जनगणना नसल्याने धोरणासाठी आवश्यक माहिती उपलब्ध नाही.

३. हक्कांच्या विखुरलेपणाचा प्रश्न: विविध संवैधानिक वर्गांमध्ये विभागणी झाल्याने सामूहिक राजकीय शक्ती कमी पडते.

**भविष्यातील वाटचाल**

विमुक्त जमातींसाठी राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र जनगणना, भटक्या लोकांसाठी पोर्टेबल शिधापत्रिका व आरोग्य सुविधा, निवासी शाळा व उच्च शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्ती, जमीन व घरकुल कार्यक्रम, पोलिस नोंदींचे पुनरावलोकन आणि भेदभावविरोधी कायदेशीर यंत्रणा निर्माण करणे अत्यावश्यक आहे. या समुदायांच्या विकासाकडे दानधर्म म्हणून नव्हे तर ऐतिहासिक न्याय म्हणून पाहिले पाहिजे.

**स्वातंत्र्याचा अपूर्ण प्रवास**

१८७१ मध्ये ब्रिटिशांनी या जमातींना गुन्हेगार बनवले; १९५२ मध्ये भारताने त्यांना विमुक्त केले; पण २०२६ मध्येही त्यांचा सन्मानपूर्ण नागरिकत्वाचा प्रवास पूर्ण झालेला नाही. स्वातंत्र्याच्या अमृतकाळात भारताने स्वतःला प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. ज्यांना राज्याने कधीकाळी अन्यायाने गुन्हेगार ठरवले, त्यांना आपण खऱ्या अर्थाने समान नागरिक म्हणून स्वीकारले आहे का?या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधल्याशिवाय भारतीय लोकशाहीची सामाजिक न्यायाची प्रतिज्ञा पूर्ण होणार नाही.

**लेखक :**
**डॉ. विनायक लष्कर,**
**संपर्क क्रमांक : ८८०६८०६३६२**

### तरुणाई

तरुणाईची अचानक
कळू लागली किंमत
आम्हीही आहो भले
सांगायं केली हिंमत

पुढे यावेचं तरुणांनी
सगळे आता सहमत
जागा अडवी म्हातारे
हीचंतर खरी रे गंमत

युवा हवे राजकारणी
जन मागणी अविरत
योग्यसारथ्यांचे हाती
अधिक सु रक्षित रथ

उच्चशिक्षीत तारूण्य
कलासगळ्यांअवगत
तमा नसते संकटांची
टाळूशकते सहजगत

विशेषआकलनशक्ती
वकृत्व करे मुखोत्गत
आवाहन कधी मैत्रीचे
आव्हान देते ते जगत

नव्या जुन्यांची सांगड
रे एकमेकांना सावरत
प्रयत्नशील रे अविरत
चालत राहीलं कसरत

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे...

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर संपूर्ण देशभर पदपथमुक्ती मोहीम गतिमान झाली असून फेरीवाला धोरणातील तरतुदींचीही अंमलबजावणी जोर धरली आहे.

त्यामुळे महाराष्ट्रातही पालिका - महापालिका सरसावल्या असल्याचे दिसून येतं असले तरी ही मोहीम बारगळण्याची चिन्हे दिसत आहेत. न्यायालय कितीही आदेश काढले तरी याला राजकर्ते वाटाण्याच्या अक्षता लावणारचं वास्तविक पाहता प्रामुख्याने फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे.

प्रभागाचे नगरसेवक आपल्या मतांसाठी त्यांची बाजू घेऊन या अंमलबजावणीला थांबवू शकतात रोजीरोटीसाठी आलेल्या विविध भागातून फेरीवाल्यांचा प्रश्न निकालात काढणे जितके आवश्यक आहे. तितकेच त्यांना काम मिळवून देणे महत्वाचे आहे. अतिशय कमी वेळेत गजबजलेल्या ठीकांनी हजारो रुपयांचा व्यवसाय करणारे फेरीवाले या आदेशामुळे उघड्यावर पडण्याची शक्यता नाकारता येतं नाही. त्यासाठी त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन केले तरचं पदपथमुक्ती मोहीम यशस्वी होईल असे वाटते.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### शासनाची बंदी कागदावरच? पनवेलमध्ये गुटखा विक्री अजूनही जोमात




**अक्षराज : अभिनव येळवे**

**दि.२४, पनवेल :** राज्य शासनाने गुटखा विक्री व साठवणुकीवर बंदी घालून अनेक वर्षे उलटली असली, तरी पनवेल शहरात गुटख्याचा अवैध व्यवसाय अद्यापही सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. किराणा दुकाने, पान टपऱ्या तसेच काही लहान व्यावसायिकांकडून छुप्या पद्धतीने गुटख्याची विक्री केली जात असल्याने शासनाच्या आदेशांचे सर्रास उल्लंघन होत आहे. विशेषतः पनवेल रेल्वे स्थानक परिसर, बसस्थानक परिसर आणि शहरातील गर्दीच्या भागांमध्ये गुटखा सहज उपलब्ध होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्राहकांकडून मागणी होताच दुकानदारांकडून लपवून ठेवलेला गुटखा विकला जात असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक ठिकाणी उघडपणे विक्री टाळली जात असली तरी गुप्त पद्धतीने हा व्यवसाय सुरू असल्याने संबंधित यंत्रणांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आरोग्यास अत्यंत घातक असलेल्या गुटख्यामुळे कर्करोगासह विविध गंभीर आजार होण्याचा धोका वाढतो.

शासनाने जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने गुटख्यावर बंदी लागू केली असली, तरी प्रत्यक्षात त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन, पोलीस विभाग आणि महापालिका प्रशासनाने संयुक्तपणे विशेष मोहीम राबवून गुटखा विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच शाळा व महाविद्यालयांच्या परिसरातही तपासणी मोहीम राबविण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवत सुरू असलेल्या या अवैध व्यवसायावर संबंधित विभागांनी तातडीने अंकुश ठेवावा, अन्यथा तरुण पिढीच्या आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### दिवा परिसरातील अनधिकृत बांधकामांवर तात्काळ कारवाईची मागणी





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, दिवा (ठाणे) :** सोमवार, दिनांक २४ ऑगस्ट रोजी डोंबिवली येथे आयोजित जनता दरबारामध्ये दिवा-शिळ नागरी हक्क समितीच्या वतीने कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांना दिवा परिसरातील सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत निवेदन देण्यात आले.

या निवेदनाची दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ठाणे महानगरपालिका आयुक्तांना पत्र देऊन सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश देत संबंधित कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी निवेदन देताना माजी नगरसेवक हिरा पाटील, ॲड. रोहिदास मुंडे व इतर पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. दिवा परिसरात होत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर ठाणे महानगरपालिकेने तातडीने ठोस व कठोर कारवाई करावी, अशी मागणी दिवा-शिळ नागरी हक्क समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

### शिळ गावातील सफाई कामगाराला ATM मध्ये गंडा; ४० हजारांची लूट
### २२ दिवसांनंतरही शिळ - डायघर पोलिस सुस्त


रघुनाथ गुणाजी पाटील,
घर क्र. 1278/172,
हनुमान मंदिराजवळ, शिळ-दिवा रोड,
शिळगाव, ठाणे-421204
मोबाईल : 8976434621
दिनांक : 03/08/2026

प्रति,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
शिळ-डायघर पोलीस स्टेशन,

विषय : एटीएम कार्डची अदलाबदल करून ₹40,000/- ची फसवणूक झाल्याबाबत तक्रार.

महोदय,

[illegible]

धन्यवाद.

आपला विश्वासू,
नाव : रघुनाथ गुणाजी पाटील

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, शिळगांव (ठाणे) :** शिळ गावातील स्थानिक रहिवासी आणि नवी मुंबई महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून प्रामाणिकपणे काम करणारे रघुनाथ गुणाजी पाटील यांना अढच् मध्ये कार्ड बदलून ४० हजार रुपयांना गंडा घालण्यात आला आहे.

या घटनेला २२ दिवस उलटूनही शिळ-डायघर पोलिसांना आरोपीचा शोध लागलेला नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

**कष्टाचा पैसा काही मिनिटांत लुटला**

रघुनाथ पाटील हे शिळ गावचे मूळ रहिवासी असून नवी मुंबई महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. दि. ०२/०८/२०२६ रोजी दुपारी २ वाजता ते शिळगाव येथील जी.पी. पारसिक बँकेच्या ATM मध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते.

कार्ड मशीनमध्ये रीड होत नसताना मागे उभ्या असलेल्या भामट्याने सर्व्हर डाऊन आहे, कार्ड काढून पुन्हा टाका असे सांगून त्यांच्या हातातून कार्ड घेतले आणि बोलण्यात गुंतवून ठेवून दुसरेच कार्ड त्यांच्या हातात दिले. काही वेळातच त्यांच्या खात्यातून ४ वेळा, प्रत्येकी १० हजार प्रमाणे एकूण ४०,००० हजार रुपये काढण्यात आले. कष्टाने कमावलेला पैसा डोळ्यादेखत लुटला गेल्याने पाटील कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. या प्रकरणी त्यांनी दि. ०३/०८/२०२६ रोजी शिळ-डायघर पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दिली आहे.

**ही एकटी घटना नाही**

याच परिसरात गंगाबाई आलिमकर आणि दिलीप भोईर यांची सुद्धा याच पद्धतीने लूट झाली आहे. ही एक संघटित टोळी असून गरीब आणि सामान्य नागरिकांना लक्ष्य करत असल्याचे स्पष्ट होत आहे.

**२२ दिवस झाले, पोलीस नक्की करते काय?**

घटना घडून २२ दिवस झाले तरी पोलिसांनी गुन्हा दाखल करून उउढत फुटेज तपासणे किंवा ज्या अढच् मधून पैसे काढले त्या अढच् चा शोध घेणे यासारखी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे शिळ-डायघर पोलीस स्टेशन नक्की करते काय? गुन्हेगार शोधणार कधी? असा सवाल शिळ गावातील ग्रामस्थ विचारत आहेत.

एका सफाई कामगाराच्या कष्टाच्या पैशाला न्याय मिळवून देण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून आरोपींना अटक करावी, अशी मागणी होत आहे.

## नाशिकमध्ये अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद राज्यस्तरीय बैठक संपन्न

# ओबीसींचे आरक्षण संपलेले नाही; छगन भुजबळ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** ओबीसींचे आरक्षण संपले आहे, असे विधान आपल्याला कदापी मान्य नाही. जात पडताळणी प्रक्रियेत जिथे चुका होत आहेत, तिथे कायदेशीर लढाई सुरू आहे. मनोज जरांगे यांची लढाई आमच्या विरोधात नाही तर सरकारच्या विरोधात आहे. त्यामुळे सरकारच यावर योग्य निर्णय घेऊन मार्ग काढेल, असे प्रतिपादन अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली नाशिकमध्ये अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची मेट भुजबळ नॉलेज सिटी आडगाव येथे राज्यस्तरीय प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक दि.२३ रोजी झाली. बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना भुजबळ यांनी ओबीसी आरक्षण, जरांगे यांचे आंदोलन आणि जातनिहाय जनगणनेबाबत भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले, आरक्षण हा गरीबी हटावचा कार्यक्रम नसून वंचित घटकांना




समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा मार्ग आहे. जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी समता परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला. गरज पडल्यास मंत्रिपदाचा त्याग करून ही समाजाच्या प्रश्नांसाठी लढलो असून, आता सरकार सकारात्मक असल्याने चर्चेतून प्रश्न सोडवण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. जात पडताळणी प्रक्रियेत जिथे चुका होत आहेत, तिथे आपण कायदेशीर लढाई लढत आहोत. ओबीसींमध्ये कोणत्या जातीचा समावेश असावा यावर सरकार निर्णय घेईल.

तसेच, प्रत्येक राज्यात ओबीसी समाजाचा शोध घेण्याच्या त्यांच्या मागणीवर सरकार काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रात माळी समाज मोठ्या प्रमाणावर आहे. जेव्हा जेव्हा समाजावर किंवा आरक्षणावर संकट आले, तेव्हा मंत्रिपदाचा राजीनामा देऊन मी राज्यभर फिरलो. छगन भुजबळ घाबरणारा माणूस नाही. गरज होती तेव्हा आपण मैदानात उतरून लढलो आहोत. पण आता सरकार आपल्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याने आम्ही चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्यावर भर देत आहोत, असे त्यांनी सांगितले.

समाजातील जे वंचित घटक आहे. जो अडलेला आहे त्या प्रत्येक व्यक्तीला मदतीचा हात देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम प्रत्येक समता सैनिकाने अविरतपणे केले पाहिजे. समीर भुजबळ हे खासदार म्हणून संसदेत काम करत असताना त्यांनी देशातील ओबीसी खासदारांना एकत्र करून केंद्र सरकारकडे मागणी देखील केली.

यावेळी आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, प्रदेश कार्याध्यक्ष बापू भुजबळ, डॉ. कैलास कमोद, ईश्वर बाळबुधे, ॲड. राजेंद्र महाडोळे, प्रा. सत्संग मुंडे, ॲड.मंगेश ससाणे, दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, सदानंद म डळिक, गुफरान शब्बीर अन्सारी, डॉ. नागेश गवळी, डॉ.स्नेहा सोनकाटे, प्रा. दिवाकर गमे, शंकरराव लिंगे, सुनील मेटे, मंजिरी धाडगे, माया इरतकर, प्रा. संतोष वीरकर, समाधान जेजुरकर, रवींद्र खरात यांच्यासह राज्यभरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# ऊस, सोयाबीन, कापूस उत्पादकांच्या हक्कासाठी केजमध्ये वज्रमूठ आवळली

## आगामी गळीत हंगामात ऊस दरवाढीसाठी एकजुटीने आंदोलनाचा निर्धार

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२४, केज (बीड) :** बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर क्रांतिकारी शेतकरी संघटना व शेतकरी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ ऑगस्ट रोजी केज येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आगामी आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी व्यापक बैठक पार पडली.

बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून आगामी काळात एकजुटीने आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.शेतकऱ्यांची विनाअट सरसकट कर्जमुक्ती, नवीन पीककर्जाचे वाटप, थकीत पीकविम्याची रक्कम मिळणे, बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना रास्त दर मिळणे, तसेच सोयाबीन व कापूस उत्पादकांच्या विविध प्रश्नांवर बैठकीत चर्चा झाली. साखरेचे दर सध्या ८० रुपयांपर्यंत पोहोचले असून भविष्यात ते १०० रुपयांचा टप्पा पार करण्याची



शक्यता आहे. त्यामुळे आगामी गळीत हंगामात ऊस उत्पादकांना योग्य व वाढीव दर मिळावा, यासाठी एकजुटीने आंदोलन उभारण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

सोयाबीन, कापूस तूर या शेतमालाला रास्त भाव मिळावा आणि शेतकऱ्यांच्या हक्कांच्या मागण्या मान्य व्हाव्यात, यासाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आगामी आंदोलनाची दिशा यावेळी निश्चित करण्यात आली.बैठकीत शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट, शेतकरी नेते जगदीश फरताडे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.


या बैठकीस शेतकरी संघटना बीडचे जिल्हाध्यक्ष डॉ. आज्जीमोद्दिन शेख, गेवराई युवा आघाडी अध्यक्ष रामेश्वर गाडे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे केज तालुकाध्यक्ष दिलीप लोंढे, युवा तालुकाध्यक्ष अतुल गवळी, केज शहराध्यक्ष फेरोजभाई पठाण, धारूरचे अनुरथ काशीद, अंबाजोगाईचे राधाकिशन गडदे, माजलगावचे महादेव गायकवाड, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे शहराध्यक्ष अभिजित लोमटे, पत्रकार दिनेश गुळवे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवा स्टेशन ते महापे सर्कल TMT बससेवा सुरू करा - वेदिका पाटील यांची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, दिवा (ठाणे) :** खर्डीगाव, दिवा आणि परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता दिवा स्टेशन ते महापे सर्कल या मार्गावर ढचढ बससेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रभाग क्र. २९ (ब) च्या नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी ठाणे महानगरपालिका परिवहन व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नुकत्याच दिलेल्या या मागणीपत्रात म्हटले आहे की, दिवा व खर्डीगाव परिसरातील लोकसंख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. येथील नागरिकांना नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि दैनंदिन कामकाजासाठी महापे व परिसरात मोठ्या प्रमाणात प्रवास


सौ. वेदिका साहिल पाटील
नगरसेविका - प्रभाग क्र. २९ (ब)
ठाणे महानगर पालिका, ठाणे

करावा लागतो. सध्या या मार्गावर सार्वजनिक वाहतुकीची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः महापे चखूउ व आसपासच्या औद्योगिक परिसरात ये-जा करणारे कामगार, कर्मचारी, विद्यार्थी यांना प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सदर बससेवा सुरू झाल्यास हजारो नागरिकांना मोठा फायदा होईल आणि वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे पत्रात नमूद केले आहे.

**नगरसेविका वेदिका पाटील यांनी बससेवेसाठी केलेल्या प्रमुख मागण्या :-**

- बस वारंवारता : दर २० ते ३० मिनिटांनी नियमित बससेवा उपलब्ध करून द्यावी.
- वेळापत्रक : सकाळी ६:०० ते रात्री १०:३० पर्यंत सेवा सुरू ठेवण्यात यावी.
- अतिरिक्त फेऱ्या : कार्यालयीन वेळ लक्षात घेऊन सकाळी ७:०० ते ११:०० व सायंकाळी ५:०० ते ९:०० या गर्दीच्या वेळेत अतिरिक्त बस फेऱ्या उपलब्ध करून द्याव्यात.

तरी या मागणीचा सकारात्मक विचार करून ढचढ प्रशासनाकडे तातडीने पाठपुरावा करावा व दिवा स्टेशन - महापे सर्कल या मार्गावर नियमित व नियोजित बससेवा सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

या निवेदनाची प्रत परिवहन व्यवस्थापक कार्यालयात दि. २९/१/२६ रोजी आवक क्र. ९५९७ अन्वये जमा करण्यात आली आहे.

# 'दृष्टी'च्या सेवेला कर्मयोगींच्या संस्कारांची जोड; पंढरपूर तालुका मोतीबिंदूमुक्त करण्याचा निर्धार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांनी आयुष्यभर केलेल्या समाजसेवेच्या संस्कारातून सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे आणि पंढरपूर तालुका मोतीबिंदूमुक्त व्हावा, या उद्देशाने यंदा तब्बल दहा हजार नागरिकांना मोतीबिंदूमुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. गेल्या ६ वर्षांत विविध नेत्र शिबिरांच्या माध्यमातून सुमारे ८ हजार ९०० रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, यंदाच्या उपक्रमातून हा आकडा १० हजारांवर नेण्यात येणार असल्याची माहिती पांडुरंग परिवाराचे युवानेते प्रणव परिचारक यांनी दिली. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पंढरपूर तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच करकंब ग्रामीण रुग्णालय येथे मोतीबिंदू तपासणी, लेन्ससह मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. करकंब, कासेगाव, रोपळे, तुंगत, पुलुज, खर्डी, रांजणी, गादेगाव, उंबरे पागे आणि भाळवणी आदी ठिकाणी ही शिबिरे घेण्यात आली. या आरोग्य अभियानाला तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी ही प्रतिसाद दिला. माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार बाबासाहेब देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिबिरांना भेट देत या उपक्रमाला पाठिंबा दिला. पुणे येथील एच.व्ही.देसाई रुग्णालयाच्या अंतर्गत शंकरराव साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर यांच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची नेत्र तपासणी केली. या शिबिरांमध्ये आतापर्यंत ४ हजार ३९० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी सुमारे २ हजार १०० रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत.

**मोफत शस्त्रक्रिया; गावातूनच रुग्णालयापर्यंत व्यवस्था**

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून टाकेविरहित शस्त्रक्रिया तसेच लेन्स प्रत्यारोपणाची सुविधा नागरिकांना मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, पात्र रुग्णांना त्यांच्या गावातूनच सोलापूर अथवा पुणे येथील रुग्णालयात नेऊन शस्त्रक्रिया करून पुन्हा त्यांच्या गावात आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी प्रणव परिचारक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष नियोजन केले असून, पुढील दीड ते दोन महिन्यांच्या कालावधीत शिबिरातून निवड झालेल्या सुमारे २ हजार १०० रुग्णांच्या शस्त्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**आरोग्यसेवेतून 'मोतीबिंदूमुक्त पंढरपूर'कडे वाटचाल**

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त राबविण्यात येत असलेला हा उपक्रम केवळ शस्त्रक्रिया शिबिरापुरता मर्यादित न राहता, पंढरपूर तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना पुन्हा स्पष्ट दृष्टी देण्याच्या व्यापक आरोग्य अभियानाचे रूप घेत आहे. गेल्या ६ वर्षांच्या सेवाकार्यातील ८ हजार ९०० शस्त्रक्रियांचा टप्पा आणि यंदाच्या २ हजार १०० शस्त्रक्रियांचा लक्ष्यांक पूर्ण झाल्यास पंढरपूर तालुका मोतीबिंदूमुक्त करण्याच्या संकल्पाला मोठी चालना मिळणार आहे.

# चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीचा मार्ग मोकळा

## ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयासाठी पालकमंत्र्यांचे तातडीचे निर्देश

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२४, चारठाणा (परभणी) :** चारठाणा व परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीची मागणी आता निर्णायक टप्प्यावर आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा वाढवून त्याचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्यात यावे, या मागणीसाठी आज मुंबई येथे पालकमंत्री मेघना दिदी बोर्डीकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन देण्यात आले.



चारठाणा हे परिसरातील महत्त्वाचे गाव असून आसपासच्या अनेक गावांतील नागरिक आरोग्य उपचारांसाठी चारठाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. सध्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांवर परिसरातील नागरिकांची मोठी गरज भागवावी लागत आहे. मात्र गंभीर आजार, अपघात, प्रसूती, तातडीची वैद्यकीय उपचारांची गरज तसेच इतर आरोग्यविषयक समस्यांसाठी रुग्णांना पुढील उपचारासाठी मोठ्या शहरांतील रुग्णालयांकडे जावे लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाढतो.

या पार्श्वभूमीवर चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राचा ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात दर्जावाढ झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. रुग्णांना स्थानिक पातळीवर अधिक चांगल्या आणि तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार आहे.

**पालकमंत्र्यांकडून मागणीची तात्काळ दखल...**

निवेदन स्वीकारल्यानंतर पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेतली. त्यांनी राज्याच्या आरोग्य विभागाच्या आयुक्तांशी तातडीने बैठक घेऊन चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला आता प्रशासकीय पातळीवर गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

चारठाणा परिसरातील नागरिकांसाठी ही मागणी केवळ एका आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीपुरती मर्यादित नसून, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पाऊल मानली जात आहे.

यावेळी मा. जि.प. सभापती नानासाहेब राऊत, मा. जि.प. सदस्य रामेश्वरराव जावळे, किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीसाठी स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, या मागणीला शासनस्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाल्यास चारठाणा आणि परिसरातील नागरिकांना उपचारासाठी दूरवर जाण्याची गरज कमी होऊन स्थानिक पातळीवरच अधिक सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे पालकमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानंतर पुढील प्रशासकीय कार्यवाहीकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शिक्रापूरमधील सराईत गुन्हेगार सुरज ऊर्फ मोन्या देडगे याच्यावर 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२४, शिक्रापूर (पुणे) :** शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दहशत माजविणाऱ्या व सार्वजनिक शांततेला धोका निर्माण करणाऱ्या सुरज ऊर्फ मोन्या संजय देडगे (वय २७ वर्षे, रा. चाकण रोड, शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे) या धोकादायक सराईत गुन्हेगारावर महाराष्ट्र झोपडपट्टीदादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए चझ्ूअ) स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. पुणे जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार त्यास ताब्यात घेऊन अकोला मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले आहे.

पुणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये मागील ५ वर्षांत संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांमधील जामिनावर मुक्त झालेले आरोपी व त्यांच्यावर नव्याने दाखल गुन्ह्यांचे रेकॉर्ड अद्ययावत करण्याचे आदेश पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. संदीप सिंह गिल्ल यांनी दिले होते. त्यानुसार दरोडा, जबरी चोरी, महामार्गावरील लूटमार, खंडणी, खून, खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर घातक शस्त्रे बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचे आदेश देण्यात आले होते.





आरोपीचा गुन्हेगारी इतिहास सुरज ऊर्फ मोन्या देडगे याच्यावर शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीत खालीलप्रमाणे ६ गंभीर गुन्हे दाखल आहेतः संगनमत करून घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक जबर दुखापत पोहोचवून शिवीगाळ व दमदाटी करणे. संगनमत करून खून व खुनाचा प्रयत्न करणे. संगनमत करून जबरी चोरी करणे व जबरी चोरीचा माल विक्री करणे.

संगनमत करून घातक हत्यारांनी दुखापत पोहोचवून अन्यायाची आगळीक करणे. दुखापत,हल्ला किंवा गैरपणे परिरोध करण्याची पूर्वतयारी करून गृहअतिक्रमण करणे व दमदाटी करणे. आरोपीवर जुना भारतीय दंड विधान प्रकरण १६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे प्रकरण ६ व १७, तसेच भारतीय हत्यार कायदा १९५९ चे प्रकरण ५ अंतर्गत गुन्हे नोंद आहेत.

**कारवाईची प्रक्रिया :** आरोपी सराईत व धोकादायक असल्याने तत्कालीन प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्याकडे एमपीडीएचा प्रस्ताव सादर केला होता. पोलीस अधीक्षकांच्या अवलोकनानंतर हा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला.

पुण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकार जितेंद्र डुडी यांनी 'महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हिडिओ पायरेट्स, वाळू तस्कर, काळा बाजार करणारे, बेकायदेशीर जुगार/लॉटरी चालवणारे व मानवी अपव्यापार प्रतिबंधक मुख्य अधिनियम १९८१ (सुधारणा अधिनियम २०२५ चा महा. अधि. क्र. २९)' अन्वये आदेश (क्रमांकः पगम/एम पी डि ए/एस आर/१६/०१/२०२६, दि. २०/०८/२०२६) पारित केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शोध घेऊन सुरज ऊर्फ मोन्या देडगे याला दि. २३/०८/२०२६ रोजी ताब्यात घेतले आणि मध्यवर्ती कारागृह अकोला येथे स्थानबद्ध के क्राइम महाराष्ट्र कारवाईत सहभागी अधिकारी व कमचारा सदरची कामगिरी खालील पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने यशस्वी केली.**मार्गदर्शन** : संदीप सिंह गिल्ल (पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण), शुभम कुमार (अपर पोलीस अधीक्षक, पुणे विभाग), रवींद्र भोसले (उपविभागीय पोलीस अधिकारी, शिरूर उपविभाग)

**तपास व अंमलबजावणी पथक** : प्रमोद क्षीरसागर (पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण), चंद्रशेखर यादव (पोलीस निरीक्षक, शिक्रापूर पोलीस स्टेशन), उमाकांत कुंजीर (पोलीस उपनिरीक्षक), जितेंद्र पानसरे (श्रेणी पोलीस उपनिरीक्षक), महेश बनकर (सहा. पोलीस उपनिरीक्षक).

**अंमलदार** : स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण (शिरूर विभाग पथक) तसेच पोलीस हवा. रोहिदास पारखे, श्रीमंत होनमाने, अमोल दांडगे, शिवाजी चितारे, अमोल नलगे आणि पोलीस अंमलदार नारायण वाळके (शिक्रापूर पोलीस स्टेशन).

# सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात वृक्षरोपणाचा अति भव्य कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, सातारा :** सातारा जिल्ह्यातीलकोरेगाव तालुक्यातीलबनवडी हायस्कूल येथे सोमवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपासून वृक्षरोपणाचा अति भव्य कार्यक्रम संपन्न झाला.सातारा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आज वृक्षप्रेमी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते या वृक्षरोपणाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होतेच परंतु बनवडी गावचे मान्यवर स्कूल कमिटी अध्यक्ष, मुख्याध्यापक त्यांचे सहकारी व सर्व विद्यार्थी या कार्यक्रमामध्ये सहभागी झाले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष राम पडगे यांनी संस्थेबद्दल माहिती देताना व वृक्षरोपणाचे महत्त्व पटवून देताना अत्यंत सोप्या शब्दांमध्ये विद्यार्थ्यांना संबोधित केले. आज खऱ्या अर्थाने विद्यार्थी मित्रांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजणे अधिक महत्त्वाचे आहे. आपण निसर्गाकडून विनामूल्य आपले जीवन जगण्यासाठी ऑक्सिजन घेत असतो परंतु या निसर्गाचे देणे देताना मात्र शासनाचा फतवा असल्याशिवाय आम्हाला याचे महत्त्व समजत नाही आणि हे महत्त्व सर्वसामान्य माणसाला, विद्यार्थ्यांना समजण्यासाठी आमची संस्था दरवर्षी असे कार्यक्रम आयोजित करून, सर्वांना यामध्ये सहभागी करून घेत असते व हे राष्ट्रीय कार्यामध्ये सहभागी होत असते.



मी, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व आज या ठिकाणी उपस्थित असलेले मान्यवर आणि विद्यार्थी मित्रांचे या कार्यक्रमांमध्ये आपण मोठ्या संख्येने सहभागी झाला यासाठी अभिनंदन व धन्यवाद व्यक्त करतो. आजचे वृक्षरोपण हे शाळेच्या तार कंपाऊंडच्या आत असल्याने झाडे निश्चित सुरक्षित राहतील व त्यांची देखभाल ही चांगल्या प्रकारे केली जाईल. त्यामुळे आजचे वृक्षरोपण निश्चित योग्य ठिकाणी झालेले आहे असे माझे मत आहे.

तर विद्यार्थी मित्रांनो या निमित्ताने मी आपणाला सांगू इच्छितो की,आपण निसर्गाचे काही देणे लागतो, यानिमित्ताने निसर्ग ऋणातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करूया.

यावेळी मुख्याध्यापकांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मी आपले संस्थेचे मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करतो व आपली संस्था अशा प्रकारे सामाजिक उपक्रम करत असते. याचा निश्चितच आम्हाला व समाजाला अभिमान आहे. आज मी या निमित्ताने सांगू इच्छितो की आज आपण केलेले वृक्षारोपणातली झाडे प्रत्येक विद्यार्थ्याला एक याप्रमाणे दत्तक देत आहे व त्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचे संगोपन करायचे आहे.

स्कूल व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.ननावरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेचे मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. ग्रामीण भागामध्ये अशा डोंगराळ परिसरामध्ये आपण सर्वजण येऊन असा सामाजिक उपक्रम जो सर्वांच्या जीवनाशी निगडित आहे. आज राज्य स्तरावर त्याला प्रोत्साहन मिळत आहे. राष्ट्रीय उपक्रम म्हणून राबवला जात आहे तो कार्यक्रम आपण करत आहात यासाठी निश्चितच आपले धन्यवाद व्यक्त करतो. आपल्या संस्थेची माहिती मला मिळाली व संस्था जे काम करत आहे व ज्या पद्धतीने काम करत आहे यासाठी आपले कौतुक करावे तेवढे थोडे आहे. आपण थोड्याच दिवसापूर्वी भोंदवडे या मराठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटून फार मोठे काम केल्याचे माझ्या वाचनात आलेले आहे. आज आपण विद्यार्थ्यांना आमच्या गावकऱ्यांना व आपल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना महिला पदाधिकाऱ्यांना सहभागी करून घेऊन हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवत आहात यासाठी मी आपले धन्यवाद व्यक्त करतो व आपल्यासारख्या संस्था समाजामध्ये निर्माण व्हाव्यात व असे सामाजिक काम सर्वत्र व्हावे अशा शुभेच्छा व्यक्त करतो.

आजच्या कार्यक्रमासाठी स्कूल कमिटी अध्यक्ष माननीय बाळासाहेब नलगे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ननवरे सर, मुख्याध्यापक अविनाश साळुंखे याशिवाय त्यांचे सहकारी श्री.कारंडे, श्री.शिंदे, श्री.कदम, शेख सर व ज्यानी आजचा कार्यक्रम आयोजित करण्यामध्ये मोलाचा सहभाग घेतला व सहकार्य केले ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्यध्यापक माननीय जाधव सर आवर्जून उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विठ्ठलराव शिरसागर, नामदेवराव झगडे, पोपटराव भोज, प्रदीप देशमाने, शिवदास किरवे, अनिल किरवे, सातारा युवराज खेडकर, प्रवीण रोकडे, राजेंद्र किरवे, अनिल किरवे, बबन किरवे, अरुण किरवे, विजय किरवे, विजय चव्हाण, विलास किरवे, प्रवीण किरवे, सतीश दळवी, शुभम लोखंडे, रामचंद्र दळवी, शिवाजीराव गंधाले, संतोष भिसे यासोबत राजश्री रोकडे, आशा किरवे, संध्या किरवे, रत्ना दळवी व लता पडगे उपस्थित होत्या.

## थोडक्यात बातम्या

### अविण्य फाउंडेशन तर्फे १५ महिला कार्यकर्त्या पदाधिकाऱ्यांचा उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल नारी शक्ती गौरव सन्मान

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२४, विरार :** विरार येथील राम-जानकी हेल्थकेअर सेंटर येथे अविण्य फाउंडेशन तर्फे आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात माणुसकी फाउंडेशनच्या महिला अध्यक्ष रजनीताई गडा आणि कार्याध्यक्ष ॲड.किरण म्हात्रे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



या सोहळ्यात अविण्य फाउंडेशनच्या वतीने रजनीताई गडा आणि ॲड. किरण म्हात्रे यांनी महिला सक्षमीकरण, गरीब व गरजू रुग्णांना मदत, तसेच सामाजिक जनजागृतीसाठी केलेल्या कार्याचा विशेष सामाजिक कार्य करणाऱ्या १५ जणींचा करण्यात आले.सर्व सन्मानित प्रीती जाधव, योजना गुरव, रुचिता नाईक, अमिता शिंदे, स्मिता कंडार, कीर्ती पंडित, प्रीती पालकर, कीर्ती शेंडे, किशोरी पाटील, वृंदा दिवेकर, प्रगती आचरेकर, प्रांजल नारकर, सौ. कोकरे ह्याचा सामाजिक नारी शक्ती चा गौरव चिन्ह देऊन सन्मान करण्यात आले.

यावेळी अविण्य फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, माणुसकी फाउंडेशनच्या माध्यमातून रजनीताई आणि किरणताई ज्या पद्धतीने समाजसेवा करत आहेत, ती प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याचा आम्हाला अभिमान आहे.

सत्काराला उत्तर देताना रजनीताई गडा म्हणाल्या, हा सन्मान माझा एकटीचा नसून संपूर्ण माणुसकी फाउंडेशनच्या टीमचा आहे. आम्ही असेच समाजकार्य करत राहू.

ॲड. किरण म्हात्रे म्हणाल्या, सामाजिक कार्य करताना मिळणारी ही पावती आम्हाला आणखी जोमाने काम करण्याची ऊर्जा देते. अविण्य फाउंडेशनचे मनापासून आभार.

या कार्यक्रमाा राम-जानकी हेल्थकेअर सेंटरचे डॉक्टर, अविण्य फाउंडेशनचे डॉ सुशील सावंत, समृद्धी संस्थेचे संस्थापक सुभाष जाधव, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत नागरे,माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष घनश्याम आंबोकर व सचिव राजेश जाधव व महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू परब यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.संजय बाळकृष्ण धामणे सर यांनी मानले.

### शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची ८ प्रकरणे 'ऑन द स्पॉट' निकाली

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत २० ऑगस्ट २०२६ रोजी नागपूर येथे नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर तसेच शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. नागपूर यांच्या कार्यालयात बैठक घेतली. या दोन्ही बैठकीत एकूण ८ प्रकरणांना 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले.





शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या दालनात नागपूर जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. यात काही प्रकरणे अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने तात्काळ या प्रकरणांना मान्यता देण्याचे आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना निर्देश दिले. त्यानुसार त्यांनी त्यांच्या अधिनस्त ४ प्रकरणांना 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र आमदार सुधाकर अडबाले यांच्या हस्ते देण्यात आले. यामध्ये मोहम्मद शोएब खान यांना प्रभारी मुख्याध्यापक पदाचे आर्थिक व प्रशासकीय अधिकार, प्रदीप शंकर पाटील यांना वरिष्ठ श्रेणी, सुनील देविदास सोलव यांना पर्यवेक्षक पदावरील पदोन्नतीस मंजुरी तर प्रणिता पुरुषोत्तम जोगी यांच्या नाव बदलास मंजुरी प्रदान करण्याबाबत मान्यतेचे पत्र 'ऑन द स्पॉट' देण्यात आले.

तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्या अधिनस्त ४ प्रकरणांना 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. यात मृणाली देवगडे, मोहम्मद कय्यूम मोहम्मद याकुब, मोहम्मद शकीब अखतर मोहम्मद जलील व सुनिता गंगाराम जाधव यांचे शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्यास 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले.

यावेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर, महानगर कार्यवाह अविनाश बडे, मोहम्मद शोएब खान व जिल्हा पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

### अनगर विद्यालयात १२०० विद्यार्थ्यांनी घेतली नशामुक्तीची शपथ

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२२, अनगर :** कै.शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगर येथे भारत सरकारच्या नशामुक्ती अभियानांतर्गत ब्रह्माकुमारी संस्थेच्या सहयोगाने विद्यार्थ्यांसाठी नशामुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यालयातील सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची शपथ घेत व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प केला.



'व्यसनमुक्त अभियान व मूल्यवान जीवन' या विषयावर ब्रह्माकुमार बाळू भाई यांनी सुमारे एक तास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यसनांचे शरीर, मन, कुटुंब आणि समाजावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट करत निरोगी, आनंदी व मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी आजपासूनच व्यसनांना नकार देत आपल्या मित्र-परिवारातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास ब्रह्माकुमारी संस्थेचे महादेव भाई, पुजारी भाई, खाडे भाई यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयाचे प्राचार्य प्रा. चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. दाडे यांनी प्रास्ताविक केले, तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक पाटील, प्राध्यापक घुले यांनी विशेष सहकार्य केले.

भारत सरकार आणि ब्रह्माकुमारी संस्थेच्या सहयोगातून राबविण्यात येणाऱ्या नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागृती निर्माण करण्याबरोबरच त्यांना सकारात्मक आणि मूल्यवान जीवनाची दिशा देण्याचे कार्य केले जात आहे. अनगर विद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या अभियानाला निश्चितच बळ देणारा ठरला.